# सायबर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण

चव्हाणनगर, पाषाण रोड, पुणे ४११००८

ई-मेल : cybercell.pnr@mahapolice.gov.in

संकेतस्थळ : www.puneruralpolice.gov.in, दुरध्वनी क्र. ०२०-२५६५४६१६


दि. २४/०२/२०२४

## प्रेस नोट

### नागरिकांना आवाहन

### फेक/बनावट/हॅक इंस्टाग्राम अकाउंट वरून होणा-या फसवणुकीबाबत...

सध्या पुणे शहरातील नामवंत डॉक्टर, वकील, व्यावसायीक, शासकीय अधिकारी/कर्मचारी व इतर नामवंत व्यक्तींचे फेक इंस्टाग्राम अकाउंट बनवुन त्यांचे फ्रेंड लिस्ट मधील मित्र-मैत्रीण तसेच नातेवाईक यांना सदर फेक अकाउंटवरुन फ्रेंड रिक्वेस्ट पाठवुन त्यांचेकडून पैशाची मागणी करीत असलेबाबत सायबर पोलीस स्टेशन येथे तकारी प्राप्त होत आहे. असे आपणासोबत घडल्यास खालील प्रमाणे प्रक्रिया/प्रोसेस करून सायबर पोलीस स्टेशन तसेच National Cybercrime Reporting Portal (NCCRP) चे www.cybercrime.gov.in या संकेतस्थळास भेट देऊन लवकरात लवकर आपली तक्रार नोंदवावी...

#### ❑ आपल्या स्व:ताचे नावाने बनवलेल्या फेक/बनावट खातेस रिपोर्ट कसे करावे?

ज्यांचे फेक/बनावट इंस्टाग्राम खाते बनवले आहे त्यांनी आपल्या स्वत:च्या इंस्टाग्राम अकाऊंटवरुन बनवलेले फेक अकाउंट शोधा (सर्च करा), स्वत:ला शोधता येत नसेल तर ज्यांना त्या प्रोफाईलवरुन रिक्वेस्ट आली आहे, त्यांच्याकडुन सदर फेक अकाऊंटची लिंक (युआरएल) मागवुन घ्या व खालील प्रमाणे प्रक्रिया/प्रोसेस करा.

- फेक/बनावट अकाउंटवर गेल्यानंतर प्रोफाईलवरील उजव्या बाजुला तीन डॉटवर ⋮ क्लिक करा.
- तुमच्या समोर आलेल्या ऑप्शन मधील **“Report”** या ऑप्शनवर क्लिक करून **“Something About This Account”** यावर क्लिक करा.
- त्यानंतर **“They Are Pretending To Be Someone Else”** हा पहिला ऑप्शन दिसेल, त्यावर क्लिक करा.
- पुढे तुम्हाला ४ ऑप्शन दिसतील, **Me / Someone I Follow / A Celebrity or Public Figure** आणि **Business or Organization.** आपण आपलीच बनवलेली फेक प्रोफाईल/अकाउंट रिपोर्ट करत असल्याने त्यापैकी **“Me”** हा ऑप्शन सिलेक्ट करा. आणि **“Next”** या बटनावर करून **“Block”** वर क्लिक करा. फेक अकाउंट काही वेळाने बंद होईल.

#### ❑ इतरांनी सदरचे फेक/बनावट अकाउंट रिपोर्ट कसे करावी -

- फेक/ बनावट अकाउंटवर गेल्यानंतर प्रोफाईलवरील उजव्या बाजुला तीन डॉटवर ⋮ क्लिक करा.
- तुमच्या समोर आलेल्या ऑप्शन मधील **“Report”** या ऑप्शनवर क्लिक करून **“Something About This Account”** यावर क्लिक करा.
- त्यानंतर “They Are Pretending To Be Someone Else” हा पहिला ऑप्शन दिसेल, त्यावर क्लिक करा.
- पुढे तुम्हाला ४ ऑप्शन दिसतील, **Me / Someone I Follow / A Celebrity or Public Figure** आणि **Business or Organization.** आपण इतरांची बनवलेली फेक प्रोफाईल/अकाउंट रिपोर्ट करत असल्याने त्यापैकी **“Someone I Follow”** हा ऑप्शन सिलेक्ट करा. आणि आपल्या समोरील **“Search”** या ऑप्शनवर क्लिक करून ज्यांच्या नावाने हे फेक/बनावट खाते बनवले आहे त्यांचे नाव सर्च करा व त्या नावावर क्लिक करून खालील **“Submit Report”** या बटनावर क्लिक करा.
- आता पुढील स्क्रिनवरील **“Next”** बटनावर क्लिक करून **“Block”** वर क्लिक करा. फेक अकाउंट काही वेळाने बंद होईल.

## ❑ आपले इंस्टाग्राम खाते सुरक्षीत कसे करावे ?

> ➢ १) प्रथम आपल्या खात्याचे **Two-factor Authentication खाली दिलेल्या पद्धतीने चालू करावे.**

- मोबाईल मधील इंस्टाग्राम अप्लीकेशन मध्ये आपले खाते चालू केल्यावर खालील उजव्या बाजूस असलेल्या आपल्या प्रोफाईल फोटोवर क्लिक करावे.
- त्यानंतर वरील उजव्या बाजूस तीन रेषा असलेल्या ऑप्शनवर क्लिक करावे. आता आपल्या समोरील पर्यायापैकी ष**Settings and Privacy”** वर क्लिक करावे.
- आता **“Account Centre”** → **“Password and Security”** → **Two-factor Authentication** वर क्लिक करून आपले इंस्ताग्राम खाते निवडावे. त्यानंतर आपल्या समोरील ०३ पर्ययापैकी **“Text Message (SMS)”** वर क्लिक करून **“Next”** बटनावर क्लिक करावे.
- आपला मोबाईल क्रमांक नमूद करावा व **“Next”** बटनावर क्लिक करून आपल्या मोबाईल वर आलेला **OTP** नमूद करून **“Next”** बटनावर क्लिक करावे.
- आता **“Done”** या बटनावर क्लिक करावे.

आता आपल्या खात्याचे **Two-factor Authentication** चालू झाले आहे. यामुळे आपले खाते हॅक होणेपासून वाचू शकेल तसेच ते सुरक्षीत देखिल होईल.

**(आपला Two-factor Authentication कोड (OTP) कोणालाही शेअर करू नये.)**

## ❑ आपले इंस्टाग्राम प्रायव्हेट (Private) कसे करावे ?

- मोबाईल मधील इंस्टाग्राम ॲप्लीकेशन मध्ये आपले खाते चालू केल्यावर खालील उजव्या बाजूस असलेल्या आपल्या प्रोफाईल फोटोवर क्लिक करावे. त्यानंतर वरील उजव्या बाजूस तीन रेषा असलेल्या ऑप्शनवर क्लिक करावे.
- आता आपल्या समोरील पर्यायापैकी “Settings and Privacy” वर क्लिक करावे. → आता “Account Privacy” वर क्लिक करून “Private Account” ऑप्शन समोरील टॉगलवर क्लिक करून ते ऑन करवा.

आता आपले इंस्टाग्राम खाते हे “Private” झाले आहे, यामुळे आपल्या खात्यावरील वयक्तिक फोटो/पोस्ट/व्हिडीओ हे आपल्याला add असलेल्या मित्र-मैत्रीण व नातेवाईक यांच्या व्यतिरिक्त कोणालाही दिसणार नाही. त्यामुळे आपल्या गोपनीय माहितीचा कोणी गैरवापर करू शकणार नाही.

CYBER POLICE STATION PUNE RURAL

24/2/2024

**पोलीस निरीक्षक,**
**सायबर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण.**